पाणी पुरवठा कार्यक्रम

पाणी पुरवठा योजनांसोबत परिसर स्वच्छतेचा अंतर्भाव असलेले एकात्मिकृत प्रकल्प मंजूर करणे.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

क्रमांक: ग्रापापु १०९५/सीआर ११५१/३९-अ/पापु-७

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ८ मार्च, १९९६

<u>प्रस्तावना</u>

राज्यातील पाणी पुरवठा कार्यक्रमाचा आढावा घेऊन सदर कार्यक्रम विहित कालमर्यादित व परिणामकारकरित्या राबविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, याबाबतचे धोरण ठरविण्यासाठी शासनाने श्वेतपत्रिका काढली होती. सदर श्वेतपत्रिकेवर विधान मंडळाच्या सन १९९५ च्या पावसाळी अधिवेशनात [illegible] चर्चा झाली. पिण्याच्या शुध्द पाणी पुरवठ्याचा संबंध हा परिसर स्वच्छतेशी येतो. परिसर अस्वच्छतेमुळे होणारे पाण्याचे प्रदुषण टाळण्यासाठी ग्रामीण भागात शौचालयाची व्यवस्था करणे, गटारे बांधणे व पाण्याचा निचरा याबाबींकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे. यासंदर्भात पाणी पुरवठा योजनांसोबत परिसर स्वच्छतेचा अंतर्भाव असलेले एकात्मिकृत प्रकल्प मंजूर करण्याबाबत श्वेत पत्रिकेत उहापोह करण्यात आला होता. यासंदर्भात शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय:-</u>

प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे पिण्याच्या शुध्द पाण्याचा पुरवठ्याचा संबंध परिसर स्वच्छतेशी येतो. परिसर अस्वच्छतेमुळे होणारे पाण्याचे प्रदुषण टाळण्यासाठी ग्रामीण भागात शौचालयाची व्यवस्था करणे, गटारे बांधणे व पाणी पुरवठा योजनेच्या सांडपाण्याचा ~~xxx~~ निचरा होणे व गुरांच्या गोठ्यांची स्वच्छता होणे यासाठी पाणी पुरवठा योजनेसोबत परिसर स्वच्छतेचा अंतर्भाव असलेले एकात्मिकृत प्रकल्प मंजूर करण्यात यावेत. त्यादृष्टीने यापुढे पाणी पुरवठा योजनेस मंजूरी प्रदान करताना त्या योजनेमध्ये परिसर स्वच्छतेचा अंतर्भाव असल्याशिवाय पाणी पुरवठा योजनेस मंजूरी दिली जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

२. हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर१६/व्यय-१५, दि. १ मार्च १९९६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ह. न. देशमुख]

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

..२/-

११

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव

मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव

मा. मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

सर्व विभागीय आयुक्त

सर्व जिल्हाधिकारी

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद [सर्व]

सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळ, एक्सप्रेस टॉवर, नरीमन पॉईंट, मुंबई

मुख्य अभियंता [ग्रामीण] महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळ, श्रेयस चेंबर्स, ४ था मजला, १७५ डी. एन. रोड, मुंबई [७० अतिरिक्त प्रतिसह] संबंधित अधिक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांना पाठविण्यासाठी

संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, महाराष्ट्र शासन, पी. एम. टी. बिल्डींग, स्वार गेट, पुणे

भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे सर्व उपसंचालक, [प्रत्येक ६ अतिरिक्त प्रतीसह] त्यांच्या क्षेत्रातील वरिष्ठ भूवैज्ञानिकांना पाठविण्यासाठी]

महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१ मुंबई

महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई

महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२ नागपूर

महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर

मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा [२५ अतिरिक्त प्रतीसह त्यांच्या क्षेत्रातील सर्व कार्यालयांना पाठविण्यासाठी]

अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई

नियोजन विभाग

वित्त विभाग/व्यय-१५

मंत्रालयातील सर्व विभाग

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील पर्यवेक्षकीय अधिकारी/कार्यासने

निवड नस्ती, पापु-०७